वाचा :- 1) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. मातसं/प्रक्रं-28/39 , दिनांक 03.12.2008
2) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रं. मातसं/नस्ती-09/110/39/दिनांक 16 सप्टेंबर 2009
3) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रं. मातसं/नस्ती/09/प्रक्र89/39/ दि.25 नोव्हेंबर 2009
4) महसुल व वन विभागाचे शासन निर्णय क्रं. संकिर्ण/2010/प्रक्र63/ल-1 सेल, दि. 27.04.2010

जा.क्र.2010/संगणक कक्ष/महा
जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक 26.11.2010
26/11/2010

**आदेश**

उपरोक्त शासन निर्णयाद्वारे चार गावासाठी 1 महा ई सेवा केंद्र या प्रमाणे हिंगोली जिल्ह्यात शहरी भागात 18 महा ई-सेवा केंद्र व ग्रामीण भागात 177 असे एकुण 195 महा-ई- सेवा केद्र स्थापना करण्यात येणार आहेत. सदर केंद्राद्वारे खाजगी व शासकीय सुविधा कमी श्रमात जनतेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यात महा-ई-सेवा केंद्र स्थापन करणेसाठी CMS Computers Ltd Mumbai यांचे सोबत शासन स्तरावर झालेले करार व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील निकष आणि सुरक्षेच्या दृष्टिने खालील अटि व शर्तीच्या अधिन राहून मंजुरी देण्यात आलेले / येणारे महा ई सेवा केंद्राद्वारे शासकीय सेवा (G2C) सुरु करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

1) सदर केंद्रा मार्फत वितरीत होणारे प्रमाणपत्र व इतर अभिलेखाचे दर शासनाने ठरवून दिल्यानुसार आकारण्यात यावेत.
2) सदर केंद्रातील हॉर्डवेअर व इतर आवश्यक साहित्य केंद्र चालकाने स्वखर्चाने करावा.
3) या कार्यालया मार्फत पुरवण्यात येणारा Database शी अनियमीतता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावा.

4) महा-ई-सेवा केंद्राद्वारे होणारे उत्पन्नातील जिल्हा व राज्य सेतु समितीचा हिस्सा शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेल्या निकषा प्रमाणे जिल्हा सेतु समिती व राज्य सेतु समितीच्या खात्या मध्ये रक्कम जमा करण्यात यावी.

5) महा-ई-सेवा केंद्रा बाबत जनतेच्या तक्रारी येणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी. जर तक्रारी आल्यास सदर केंद्र विना पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल. अशा रद्द करण्यात आलेल्या महा ई-सेवा केंद्रातील शासकीय अभिलेख या कार्यालयास जमा करण्याची जबाबदारी CMS, Computer Ltd, Mumbai यांची राहील.

6) या कार्यालया मार्फत मंजुरी देण्यात आलेल्या महा-ई-सेवा केंद्रा मार्फतच शासकीय (G2C) सेवा पुरविण्या याव्यात. मंजुरी देण्यात आलेल्या महा ई सेवा केंद्रास या कार्यालयाद्वारे प्रमाणपत्र देण्यात येईल. (सदर प्रमाणपत्र महा ई सेवा केंद्रात दर्शनी ठिकाणी लावणे बाबत आवश्यकत्या सुचना देण्यात याव्यात.)

7) सदर केंद्रा मार्फत वितरीत होणाऱ्या 7/12 आणि 8-अ च्या उताऱ्याची संगणककिकृत ई-प्रत मागणीनुसार उपलब्ध करुन द्यावी. सदर उताऱ्याच्या प्रतीवर महा ई सेव केंद्र चालक हा परिशिष्ट अ प्रमाणे काऊन्टर स्टॅम्प मारुन देईल. या प्रतीच्या सत्यतेची पडताळणी http://mahabhulekh.mumbai.nic.in या संकेतस्थळावर करता येईल.

8) महा-ई-सेवा केंद्रा मार्फत वितरीत होणाऱ्या प्रमाण पत्रा बाबतचा MIS Reports प्रत्येक महिण्याचे 3 तारखेच्या आत जिल्हा प्रतिनिधी, सी.एम.एम. कॉ. लि. मुंबई यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा.

**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष**
**जिल्हा सेतु समिती हिंगोली**

प्रतिलीपी,

1) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) मा. अवर सचिव (ल-1 सेल), महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

3) मा. अवर सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनायलय, समान्य प्रशासन विभाग मंत्रांलय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

4) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

5) सहाय्यक जिल्हाधिकारी हिंगोली / वसमत यांनी देवून कळविण्यात येते की, आपण आपल्या उपविभागातील 7/12 व 8 अ संगणातील नोंदी तहसीलदार यांचे कडून वेळोवेळी करण्या बाबत आपल्या स्तरावरुन आवश्यकती कार्यवाही करण्यात यावी.

6) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प. हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

7) तहसीलदार, हिंगोली / कळमनुरी / सेनगांव / वसमत / औढा ना. यांना देवून सुचित केले जाते की, 7/12 आणि 8अ उताऱ्यांची अद्यावत माहिती http://mahabhulekh.mumbai.nic.in या संकेस्थळावर वेबसाईटवर अपलोड करण्याची जवाबदारी संबधीत तहसीलदार यांची राहील कृपया याची नोंद घ्यावी. तसेच दर महिण्याची 7/12 व 8-अ उतारा Backup CD जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्येक महिण्याचे 1 तारखेला सादर करण्यात यावी.

8) श्री. अमिन शेख, औरंगाबाद विभाग प्रकल्प इंचार्ज सिएमएस कॉम्पुटर्स लि. प्लॉट नंबर 91, स्ट्रीट नं. 7 एमआयडीसी मारोळ, अंधेरी ईस्ट, मुंबई - 93 यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष**
**जिल्हा सेतु समिती हिंगोली**

ISSUED
Date 29/11/10
Outward Clerk
Collector Office, Hingoli